CNRNo.MHAM080001732013

नि.दि. दावा क्र.०७/२०२३
पांडुरंग - वि - प्रभाकर
नि.क्र.१३४

## नि.क्र.१३४ वरील आदेश

(दिनांक ०५.०२.२०२४)

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादींना पुढील कार्यवाही लवकरात लकवर करण्याचे निर्देश देण्याबाबत किंवा प्रतिवादींना पुरावा सादर करण्यास वेळ लागत असेल तर खर्च बसविण्याबाबत दाखल केलेला आहे.

२. अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर दिसून येते की, प्रस्तुतचा दावा वादी याने उद्घोषाणा वाटणी आणि वाद मिळकतीचा स्वतंत्र ताबा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये वादी आणि प्रतिवादी यांचे परस्पर विरोधी कथन लक्षात घेतलयानंतर दिनांक १६.०१.२०१५ रोजी वाद मुद्दे (नि.क्र.२० खाली) निश्चीत करण्यात आलेली आहेत. त्यानंतर वादीने प्रथमतः आपला पुरावा दिनांक २०.०३.२०१४ रोजी सादर केला आहे व आपली अतिरीक्त सरतपासणी ही दिनांक २९.०८.२०१५, २४.०८.२०१७ रोजी नोंदविली आहे. त्यानंतर वादीने आपला उलटतपास हा दिनांक २३.१०.२०१७ रोजी, २१.०८.२०१८ रोजी आणि शेवटी दिनांक २४.०३.२०२२ रोजी नोंदविला आहे. त्यानंतर वादीने आपला साक्षीदार क्र.०२ याचा पुरावा दिनांक ३०.०४.२०२० रोजी सादर केला आहे व त्याची उलटतपासणी दिनांक ०१.०७.२०२२ रोजी नोंदविली आहे. त्यानंतर वादीने आपला पुरावा दिनांक ०१.०७.२०२२ रोजी बंद केला आहे. त्यावरुन दिसून येते की, वादीने आपला पुरावा संपविण्यासाठी सन २०१५ पासून ते सन २०२२ पर्यत एकूण सात वर्षाचा कालावधी घेतला आहे. त्यानंतर दिसून येते की, प्रतिवादी क्र.०१ याने आपला पुरावा दिनांक १९.०९.२०२२ रोजी सादर केला आहे व उलटतपासणी ही दिनांक ०२.१२.२०२२ रोजी नोंदविली आहे. त्यानंतर प्रतिवादीने आपला सा.क्र.०२ चा पुरावा दिनांक १८.१०.२०२२ रोजी सादर केला आहे आणि त्याची उलटतपासणी ही दिनांक २३.१२.२०२३ रोजी नोंदविली आहे. त्यानंतर प्रतिवादीने आपला सा.क्र.०३ हा

दिनांक १८.१०.२०२३ रोजी सादर केला आहे आणि त्याची उलटतपासणी ही दिनांक २३.०३.२०२४ रोजी नोंदविली आहे. त्यानंतर प्रतिवादीने आपला सा.क्र.०४ ची सरतपासणी ही दिनांक २५.१०.२०२३ रोजी नोंदविली आहे व त्याची उलटतपासणी ही दिनांक १८.११.२०२३ रोजी नोंदविली आहे. त्यामुळे दिसून येते की, वादीपेक्षा जास्त गतीने प्रतिवादी प्रकरण चालवित आहे.

**३.** नि.क्र.२० खालील वाद मुद्दयांचे अवलोकन केल्यानंतर दिसून येते की, प्रतिवादीने वाद मिळकतीचा एकमेव मालक असल्याचे कथन केले आहे आणि त्यासाठी प्रतिवादीने मृत्युपत्राचा आधार घेतलेला आहे. ते मृत्युपत्र सिध्द करण्यासाठी प्रतिवादीने मृत्युपत्राचे साक्षीदार यांना समन्स काढण्यासाठी अर्ज (नि.क्र.१२८) दिला आहे. त्यामुळे दिसून येते की, प्रतिवादीला सदर मृत्युपत्र साक्षीदार द्वारे सिध्द करण्याची संधी देणे गरजेचे आहे.

**४.** सदर अर्ज (नि.क्र.१२८) च्या अनुषंगाने मृत्युपत्रातील साक्षीदार यांना साक्ष समन्स काढले असता बेलिफ यांचा अहवाल (नि.क्र.१३२) चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदर मृत्युपत्राचा साक्षीदार राजारामसिंग लक्ष्मणसिंग रघुवंशी हा मयत आहे. सदर मृत्युपत्राचा दुसरा साक्षीदार नथ्थुजी माथुरकर याला साक्ष समन्स काढले असता त्याचा अहवाल मागील तारखेपर्यत प्राप्त झाला नव्हता. सदर साक्षीदाराचा बेलिफ अहवाल (नि.क्र.१३७) आज दिनांक ०५.०२.२०२५ रोजी न्यायालयाच्या अभिलेखाला लागलेला आहे. त्या अहवालावरुन दिसून येते की, सदर साक्षीदाराचा पत्ता हा बरोबर नाही. त्यामुळे दिसून येते की, प्रतिवादी हे हेतु पुरस्सर विलंब करीत नाही. प्रकरण जलदगतीने चालविण्यासाठी गरजेच्या कायदेशीर प्रक्रियेमुळे विलंब होत आहे. त्यामुळे वादीचा अर्ज हा या निर्देशानुसार नामंजुर करण्यात येतो की, प्रतिवादीने शक्य तेवढया लवकर कायदेशीर कार्यवाही पुर्ण करुन आपला पुरावा संपवावा.

दिनांकः– ०५.०२.२०२५

VIJAY GOVIND PARWARE
Digitally signed by VIJAY GOVIND PARWARE
Date: 2025.02.05 17:20:27 +0530

विजय गो. परवारे

**दिवाणी न्यायाधीश क.स्तर**

**भातकुली**

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : V.M.Bhangale,

Court name : Court of Civil Judge J.D. Bhatkuli.

Date : 05.02.2025.

Order signed by the

Presiding Officer on : 05.02.2025.

Order uploaded on : 05.02.2025.